.. gaNesha aaratii ..

॥ गणेश आरती ॥

जय देव जय देव जय वक्रतुंडा ।
सिंदुरमंडित विशाळ सरळ भुजदंडा ॥ जय ॥ धृ ॥

प्रसन्नभाळा विमला करिं घेउनि कमळा ।
उंदिरवाहन दोंदिल नाचसि बहुलीला ।
रुणझुण करिती घागरिया घोळा ।
सतार सुस्वर गायन शोभित अवलीला ॥ जय ॥ १॥

सारीगमपधनीसप्तस्वरभेदा ।
धिमिकिट धिमिकिट मृदंग वाजति गतिछंदा ।
तातक् तातक् थैय्या करिसि आनंदा ।
ब्रह्मादिक अवलोकिती तव पदारविंदा ॥ जय ॥ २॥

अभयवरदा सुखदा राजिवदलनयना ।
परशांकुशलड्डूधर शोभित शुभवदना ।
ऊर्ध्वदोंदिल उंदिर कार्तिकेश्वर रचना ।
मुक्तेश्वर चरणांबुजिं अलिपरि करी भ्रमणा ॥ जय ॥ ३॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 22, 1999